# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

**पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,**
**जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.**
**Website- www.sic.maharashtra.gov.in**

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com


**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**
**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :३३४/२०२३/नाशिक**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| श्री. रामदास कारभारी बच्छाव,<br>रा. मु.पो.दरेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक-४२३१०५. | नायब तहसिलदार, अपर जिल्हाधिकारी कार्यालय, मालेगाव, कोर्टा समोर, कॅम्प रोड, मालेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक-४२३२०३. |

## सुनावणी दिनांक १०/०६/२०२५

तक्रारदार यांनी दिनांक २८/०४/२०२३ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १०/०६/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित होते. तक्रारदार अनुपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी आयोगाकडे सादर केलेल्या दिनांक २८/०४/२०२३ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमुद केले आहे की, "दि. १२/१०/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दि. ०९/११/२०२२ रोजीचे दिशाभूल करणारे उत्तर देऊन मूळ माहिती अधिकार अर्ज वर्ग न करणे माहिती अर्जदारास न पुरविणे असे उपद्रवी प्रकार सतत घडत असून त्यांच्यावर कठोर शास्ती होणे जरुरी आहे. तसेच मला मुळ अर्जाप्रमाणे व त्रासापोटी रुपये ०५ लाख नुकसान भरपाई मिळावी ही नम्र विनंती. "

३) तक्रारदार यांनी दि. १२/१०/२०२२ रोजीच्या माहिती अर्जान्वये, दिनांक ०१/०१/२००१ ते दि. १२/१०/२०२२ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे:-

"आपल्या अधिकार क्षेत्रात सुरु असलेले स्टोन क्रेशर व उत्खनन करणे कामी देण्यात आलेल्या परवानगीची यादी, करारनामा, तसेच स्टोन केशर बसवणे व दगड उत्खनन करणे कामी दिलेल्या जागेचा तपशील, मोजमाप इत्यादी स्वरुपाची कार्यालयीन अभिलेखात जतन केलेल्या माहिती वरुन प्रमाणीत/ सत्यप्रत उपलब्ध होणे कामी."

संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त न झाल्याने तक्रारदार यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, मालेगाव यांचेकडे दि. १४/११/२०२२ अन्वये प्रथम अपील अर्ज सादर केला आहे.

४) सुनावणी दरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, तक्रारदार यांनी सादर केलेल्या दि. ०९/११/२०२२ च्या पत्रात असे नमूद केले आहे की, "आपल्या माहितीच्या अधिकारा खालील अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला आहे. सदर अजार्त या कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रात सुरु असलेले स्टोन क्रेशर व उत्खनन कामी देण्यात आलेल्या

परवानगीची यादी, करारनामा तसेच स्टोन क्रेशर बसविणे व दगड उत्खनन करणेकामी दिलेल्या जागेचा तपशील, मोजमाप इ. स्वरुपाची कार्यालयीन अभिलेखात जतन केलेली माहिती मिळणे बाबत नमूद आहे.

या कार्यालयामार्फत स्टोन क्रेशर व उत्खनन कामी कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यात येत नाही. त्यामुळे आपण मागणी केलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. तथापि, सदर बाबत आपण मा. जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक यांचे कार्यालयाशी संपर्क साधल्यास आपणास अपेक्षित होऊ शकते.

सदर माहितीने आपले समाधान न झाल्यास आपण प्रथम अपिलीय अधिकारी तथा मा. अपर जिल्हाधिकारी मालेगाव यांचेकडून मुदतीत अपिल दाखल करु शकता."

५) तक्रारदार यांनी दाखल केलेल्या दि. १२/१०/२०२२ च्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने संबंधित जन माहिती अधिकारी यांना दि. ०९/११/२०२२ च्या पत्रान्वये वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविल्याचे दिसून येते. मात्र, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन दि. २६/१२/२०२२ रोजी पारीत करुन सदरचा माहितीचा अर्ज तात्काळ संबंधित जन माहिती अधिकारी कडे वर्ग करावा, असे आदेशित केले आहे. तसेच, तक्रारदार सुनावणीस अनुपस्थित असल्याने तक्रार संदर्भात काही सिध्द केले नसल्याने, सदर प्रकरणी आयोग पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) प्रस्तुत तक्रार क्र. ३३४/२०२३/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

जावक क्र ८०९०

19 NOV 2025